स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

येथील इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी संशोधनाचा आराखडा

विषय - छत्रपती शिवरायांची पर्यावरणनीती - एक ऐतिहासिक अवलोकन (सन १६३० ते १६८०)

मार्गदर्शक

डॉ. अरविंद पी. सोनटक्के

दिगंबरराव बिंदू महाविदयालय, भोकर, जि. नांदेड

संशोधक विदयार्थिनी

प्रा. सौ. धनश्री रामचंद्र कापशीकर

उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर

जून २०१९

संशोधनाचा आराखडा

छत्रपती शिवरायांची पर्यावरणनीती - एक ऐतिहासीक अवलोकन

(१६३० ते १६८०)

विषयप्रवेश -

भारताच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात 'शिवकाल' म्हणजे एक तेजस्वी पर्व आहे. शिवकाळाचा समग्र इतिहास तयार करणे हे एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्या दृष्टीने या काळाच्या ऐतिहासिक साधनांचा अधिकाधिक शोध घेणे आवश्यक आहे. शिवकाळाच्या बाबतीत अस्सल साधनांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. दरबारी किंवा शासकीय स्वरुपाचा पत्रव्यवहार हा शिवकाळातील अल्पप्रमाणात उपलब्ध आहे. १६८९ ला छत्रपती संभाजी राजांना ठार मारुन औरंगजेबाने रायगड जिंकून तो सिध्दी प्रमुखाच्या हवाली केला. मुघल व मराठे संघर्ष काळात मुघलांनी ताब्यात आलेल्या मराठा किल्ल्यांवरील कारखाने नष्टप्राय केले. थोडक्यात शिवकाळाच्या इतिहासाला उपयुक्त अशी साधनसामुग्री काळाच्या भक्ष्यस्थानी पडली. खाजगी दस्तावेज, सनदा, महजर यांच्यावरुन राजकीय घडामोडी समजून घ्याव्या लागतात. काही साधने अजुनही उपलब्ध होऊ शकली नाहीत. उदाहरणार्थ - जयराम पिंड्ये यांचे काही संस्कृत ग्रंथ.

शिवकालीन कागदपत्रांचा अधिक बारकाईने शोध घेण्याचा प्रयत्न अजुनही अनेक इतिहासकार, संशोधक, लेखक, विचारवंत करीत आहेत. शिवकालावर अगदीच अल्पप्रमाणावर लिखाण झालेले आहे. शिवरायांचे मध्ययुगीन काळात, पुरोगामी स्वरुपाचे लोकल्याणकारी राज्य होते. हे स्पष्ट करणाऱ्या अर्वाचीन ग्रंथांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी आहे. अशी खंत अनेक विचारवंताना वाटते. तशी ते व्यक्तही करतात. म्हणूनच शिवकाळाची इतिहास लेखनासाठी जी जी साधने उपलब्ध होतील त्या नुसार शिवरायांचे राज्य त्यांचे लोकाभिमुख प्रशासन हे पर्यावरण पुरक विचारांनी व कृतींनी भारलेले होते. हे सांगण्याचा अल्पसा प्रयत्न **'छत्रपती शिवरायांची पर्यावरण निती - एक ऐतिहासिक अवलोकन'** या प्रबंधातून केला जाणार आहे.

भारतीय संस्कृतीतील शिकवणच अशी आहे की, निसर्गाशी मिळते-जुळते घ्या उपलब्ध नैसर्गीक संसाधनांचा विचारपूर्वक व जबाबदारीने उपयोग करा. त्यांचे संरक्षण, संवर्धन करा, त्यांची गुणवत्ता खालावणार नाही, याची काळजी घ्या आणि त्याप्रमाणे आपली जीवनशैली विकसीत करा. अगदी इ.स. पुर्व काळातील गौतमबुध्द, महावीर, आर्य चाणक्य तसेच मध्ययुगीन काळात छत्रपती शिवराय ते आधुनिक काळात राजर्षि शाहू महाराज यांच्या पर्यंतच्या सर्व जाणत्या राज्यकर्त्यांनी

निसर्ग संरक्षण आणि संवर्धन याबाबत सातत्याने आज्ञा आणि सुचना जारी केल्याचे आढळते. पृथ्वीवरील जमीन, पाणी, वातावरण यांनी बनलेला भौतीक परिसर, त्यांत आढळणाऱ्या निर्जीव आणि सजीव सृष्टीतील विविध घटक आणि त्या सर्वांचे परस्परसंबंध यांचा पर्यावरण या संकल्पनेत समावेश होतो.

खरे तर, निसर्गावर संस्कार करण्याची, निसर्गातील वेगवेगळया व्यवस्थांमध्ये, चक्रांमध्ये बदल घडवून आणण्याची आपली क्षमता मनुष्याने शेतीचा शोध लावला, तेव्हाच दाखवून दिली. परंतु त्यानंतरही अनेक शतके मानवाचा निसर्गात हस्तक्षेप खूपच मर्यादित राहिला. मानवाने घडवून आणलेले हे बदल, सामावून घेण्याची कुवत ही निसर्ग व्यवस्थेत होती, हेच मुळात मानवाला कित्येक शतके समजले नाही, आणि नेमकी हीच गोष्ट छत्रपती शिवरायांनी ओळखली. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी महाराष्ट्रात मराठ्यांचे (अठरापगड जमातींचे) राज्य त्यांनी निर्माण केले आणि मराठी राज्याच्या उदय आणि विकासात शिवरायांनी पर्यावरणीय अनेक घटकांचा उपयोग करुन घेतला. आजच्या काळात अनेक पर्यावरणीय समस्या उद्‌भवलेल्या असताना शिवरायांचे पर्यावरणीय विचार, दृष्टीकोन व पर्यावरणनिती ही आदर्शवत आणि अनुकरणीय अशीच आहे, म्हणूनच या विषयाची निवड मी केली आहे.

प्रकरण १ ले

इतिहास संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात इतिहास संशोधन पध्दती मांडण्यात येत आहे यामध्ये प्रबंधाचे महत्व सांगून शिवरायांच्या पर्यावरणनीती संदर्भातील संशोधनाचे उद्देश सांगण्यात येत आहेत. आजच्या काळातील पर्यावरणीय समस्यांचा व त्यावरील उपायांचा विचार करता असे लक्षात येते की, शिवरायांची पर्यावरणनिती हाच त्यांच्या आदर्श राज्य व्यवस्थेचा महत्वाचा गाभा होता / घटक होता. म्हणूनच त्याची व्याप्ती अधिक आहे याचा विचार केला जाणार आहे. संशोधनाची पध्दती व गृहीतके याच प्रकरणात स्पष्ट करुन संशोधनाच्या विषयाची साधने व त्यांची उपलब्धता यांचा विचार मांडला जाणार आहे.

प्रबंधाचे महत्व - पर्यावरण हा आजच्या काळात अत्यंत महत्वाचा विषय ठरत आहे. कारण पर्यावरण ऱ्हासामुळे मानवी संस्कृतीवर विपरीत परिणाम होत आहे. आज अनेक ग्रंथातून जागतिक पातळीवर परखड भाष्य केले जात आहे. १९६२ साली श्रीमती राशेल कार्सन यांनी 'द सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकातील पर्यावरण विनाशाच्या दिलेल्या इशाऱ्यामुळे पर्यावरण संवर्धनाची चळवळ सुरु झाली. अनेक आधुनिक बदलांमुळे चांगल्या गोष्टीं बरोबर अपरिहार्यपणे वाईट गोष्टीही येऊ लागल्या. कौटुंबिक आयुष्य व नातेसंबंध यांची अपरिमित हानी होत आहे. यावर उपाय व नुकसान भरपाईचा मार्ग म्हणजे पर्यावरण संवर्घन होय. इतिहासातील महापुरुषांनी दिलेल्या वैचारीक योगदानाने व कार्यकर्तृत्वाने आज देशाला जे योगदान दिले आहे. त्यात छत्रपतींचे पर्यावरण विषयक योगदान त्यांच्या विविध धोरणातून स्प्ष्ट होते. याचे ज्ञान अशा प्रबंधातून येणे महत्वाचे वाटते. म्हणून 'छत्रपती शिवरायांची पर्यावरण निती- एक ऐतिहासिक अवलोकन' हा विषय संशोधनासाठी मी निवडलेला आहे.

प्रबंध संशोधनाचे उद्देश -

१. कोणत्या प्रतिकुल परिस्थितीत शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली त्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. शिवरायांचे स्वराज्य स्थापनेचे प्रारंभिक कार्य अभ्यासणे.

३. शिवरायांचे आदिलशहा, कुतूबशहा व मुघल या शत्रुंशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.

४. मराठी राज्याच्या स्थापनेसाठी सहयाद्रीचा परिसर कसा अनुकुल होता, महत्वाचा होता त्याची माहिती मिळवणे.

५. मराठी राज्याच्या स्थापनेसाठी नैसर्गिक परिस्थितीचा उपयोग शिवरायांनी कसा करुन घेतला त्याचा अभ्यास करणे.

६. शिवरायांनी एतद्देशिय व परकीय सत्तांशी संघर्ष करताना नैसर्गिक वातावरणात जे गनीमी कावा युध्दतंत्र वापरले, विकसित केले त्याचा सर्वांगीण अभ्यास करणे.

७. पर्यावरणीय घटकांच्या वापराने दुर्ग बांधणी, दुर्ग दुरुस्ती, जलदुर्ग बांधकामे, शिवरायांनी केली. याचा सविस्तर अभ्यास करणे.

८. 'आरमार' या राज्याच्या स्वतंत्र अंगाचा पर्यावरणीय दृष्टीकोनातून शिवरायांनी स्वराज्य रक्षण व संवर्धनासाठी वापर केला. याची माहिती आधुनिक विचार पध्दतीने मांडणे.

९. शिवकालीन किल्ल्यांवरील पाणी व्यवस्थापनाचा आढावा घेणे.

१०. शिवरायांचे दुष्काळ निमुर्लनाचे प्रयत्न पर्यावरणपूरक होते याचा अभ्यास करणे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा - छत्रपती शिवरायांची पर्यावरण निती - एक ऐतिहासिक अवलोकन या विषयावर संशोधन केले जाणार आहे. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा न ठरवल्यास संशोधन भरकटण्याचीच अधिक शक्यता असते, त्यामुळे शिवजन्माच्या घटनेपासून मराठी राज्याची स्थापना ते शिवरायांचा मृत्यु (१६८०) इतकी कालमर्यादा स्पष्ट करत शिवरायांचे राज्य प्रशासन त्यांची पर्यावरण विषयक भूमिका मांडली जाणार आहे. कालमर्यादा निश्चित असली तरीही योग्य तेथे आवश्यक त्या विषयानुरुप सामाजीक, सांस्कृतीक, धार्मीक, आर्थिक, राजकीय, घटनांचा व परिस्थितींचा देखील उल्लेख करण्यात येईल.

संशोधन पध्दती - छत्रपती शिवरायांची पर्यावरण निती - एक ऐतिहासिक अवलोकन (१६३० ते १६८०) या विषयावर संशोधन करताना संशोधन पध्दती चार प्रकारच्या आहेत. निवेदनात्मक किंवा वर्णनात्मक, संदर्भ, विश्लेषणात्मक आणि मुलभूत संशोधनपध्दती. प्रस्तुत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. मिळालेल्या सर्व माहितीची चिकित्सा करुन विश्वसनियतेच्या आधाराने, तटस्थ राहून माहितीचे संकलन केले जाईल व त्यावरुन निष्कर्ष हे काढले जातील.

प्रबंधाची साधने - या संशोधन विषयासाठी भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, पेशवे दप्तर पुणे, मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, येथून कागदपत्रे व संदर्भग्रंथ उपलब्ध करुन घेतले जातील. संस्कृत आणि मराठी साधने, परकीयांची प्रवास वर्णने, पोर्तुगिजांची व इंग्रजांची साधने (फॅक्टरी रेकॉर्डस्), छत्रपती शिवरायांची पत्रे यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यातूनच या विषयास योग्य न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. छत्रपती शिवरायांची पर्यावरणनिती ही इतिहास अभ्यासकांना, संशोधकांना, समाजाला मार्गदर्शक ठरेल असा हा प्रयत्न असणार आहे.

प्रबंधाची गृहीतके -

छत्रपती शिवरायांची पर्यावरणनिती - एक ऐतिहासिक अवलोकन (१६३० ते १६८०) या संशोधन विषयाचा अभ्यास आधुनिक विचार धारेने केला जाणार आहे.

१. मराठी राज्याच्या उदय आणि विकासात (मध्ययुगीन काळात) पर्यावरणीय घटकांचा उपयोग करुन घेणारे छत्रपती शिवराय हे एकमेव राजे होते.
२. शिवरायांचे राज्य हे पर्यावरण पूरक विचारांनी व कृतींनी परिपूर्ण असे होते.
३. लोकांभिमुख प्रशासन करीत महाराष्ट्राला शिवरायांनी पर्यावरण विषयक योगदान दिलेले आहे.
४. पर्यावरणाचे संवर्धन करतच छत्रपती शिवरायांनी आपल्या मुलुखाचे संरक्षण केले.
५. राज्य स्थापना, राज्य विस्तार, गनिमी कावा या युध्दतंत्राचा विकास यासाठी शिवरायांनी निसर्गाचाच आधार घेतला होता.
६. दुर्ग बांधणी, जलदुर्गाची उभारणी, दुर्ग दुरुस्त्या यासाठीही स्वतः शिवरायांकडे पर्यावरण विषयक ज्ञान आणि जाणही होती.
७. सहयाद्रीच्या परिसराचा परिपूर्ण अभ्यास शिवरायांनी केलेला होता.
८. नैसर्गिक वातावरणातच लष्करी प्रशिक्षण दिले जात असे.
९. नैसर्गिक परिस्थितीचा फायदा घेऊनच छत्रपती शिवरायांनी शत्रुंवर विजय मिळवले.
१०. वनसंपत्तीचे संवर्धन करतच शिवरायांनी भारतीय आरमाराची उभारणी मध्ययुगात केली.
११. शिवराय आणि प्रजा देखील 'पाणी हीच गडावरील संपत्ती' असे मानत.
१२. दुष्काळ निर्मूलनाचे विविध उपाय योजताना शिवरायांनी जलव्यवस्थापनावर भर दिला.

प्रकरण २ रे

छत्रपती शिवाजी महाराज चरित्र व कार्य

महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे फार मोठे योगदान आहे. हा संप्रदाय महाराष्ट्राच्या बाहेर पोहचवण्याचे कार्य संत नामदेवांनी केले. वारकरी संप्रदायाचा उदय, प्रसार, प्रचार आणि त्यातून निर्माण झालेला एकजिनसी समाज ही लाभलेली सामाजीक परिस्थिती शिवरायांना राज्य निर्माण करण्यासाठी उपयोगी पडली. 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे वारकरी संप्रदायाच्या बाबतीत म्हंटले जाते. संत तुकाराम हे तर छत्रपती शिवरायांच्या समकालीन होते. त्यामुळे शिवरायांनी त्यांच्या किर्तनांचा लाभ घेतलेला होता. त्यांची शिकवण ही प्रत्यक्षात महाराजांनी आचरणात आणलेली दिसते. 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे, वनचरे' या तुकारामांच्या अभंगातील शिकवण पर्यावरणीय दृष्टीने त्यांनी लोकाभिमुख प्रशासन राबिवताना स्वराज्यात अमंलात आणली.

महाराष्ट्रात मराठयांची सत्ता उदयास आली, ही १७ व्या शतकातील भारताच्या इतिहासातील अत्यंत वैशिष्टयपूर्ण घटना मानली जाते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवरायांनी मराठी राज्याची स्थापना केली. अनेक संकटांना सामोरे जात, त्यांनी राज्यवृध्दी केली आणि लोकाभिमुख प्रशासन करण्याचा कायम प्रयत्न केला या राज्याच्या स्थापनेसाठी मागील ३०० वर्षांची पार्श्वभूमी कारणीभूत होती. यासाठी प्रस्तुत प्रकरणात शिवचरित्राचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे.

१. जन्म व बालपण
२. स्वराज्य स्थापनेसाठी प्रारंभीक कार्य
३. छ. शिवराय आदिलशहा संबंध
४. छ. शिवराय व मुघल
५. छ. शिवराय व कतुबशहा
६. सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज
७. राज्याभिषेक
८. मृत्यू

प्रकरण ३ रे

युध्दतंत्र, दुर्ग आणि पर्यावरण

युध्दतंत्र, दुर्ग आणि पर्यावरण या प्रकरणाच्या सुरुवातीला सहयाद्रीच्या नैसर्गीक परिसराची माहिती दिली जाणार आहे. शिवरायांच्या पर्यावरणनितीचा विचार करताना ज्या भागात मराठयांचे राज्य स्थापन झाले आणि केवळ पाव शतकात ते विस्तारले, त्या मध्ययुगात 'दख्खन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसराची, नैसर्गीक वातावरणाची संपूर्ण जाण, आणि भौगोलिक ज्ञान शिवरायांकडे होते. म्हणूनच पर्यावरणाचा वापर करुन सहयाद्रीच्या या दुर्गम भागात शिवरायांनी एक युध्दतंत्र विकसीत केले ते म्हणजे गनिमी कावा. याच युध्दतंत्राच्या जोरावर त्यांनी एतद्देशीय सत्तांचा बंदोबस्त केला. गनिमी काव्याचा हा तडाखा जागतिक किर्तीचा बनला. याचा सखोल अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. पर्यावरणाच्या सखोल अभ्यासानेच शिवरायांनी अभेद्य असे दुर्ग व जलदुर्ग बांधले.

कोणत्याही युगात जगाच्या पाठीवरील कोणत्याही भागात राज्यकर्त्यांची तीन कामे महत्वाची असतात.

१. आपल्या मुलखाचे रक्षण करणे.
२. मुलुखाचा पर्यायाने रयतेचा सर्वांगीण विकास करणे.
३. शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे व अबाधीत राखणे.

छत्रपतींचे देखील स्वराज्य स्थापने नंतर हेच उद्दिष्ट होते.

राज्य स्थापना करुन राज्य मजबूत करणे व ते संरक्षीत करणे यासाठी त्यांनी निसर्गाचाच आधार घेतला होता. तो घेताना त्यांनी पुढील गोष्टी महत्वाच्या मान्यल्या.

१) युध्दतंत्र - गनिमी कावा
२) दुर्ग बांधणी व दुर्ग दुरुस्ती
३) गनिमी काव्याचा अर्थ, लष्कर दले
४) युध्दनितीच्या वापरासाठी सहयाद्रीच्या परिसराचा वापर (नैसर्गिक परिस्थितीचा)
५) गनिमी काव्याचे हेतू
६) मराठयांच्या युध्दतंत्राच्या प्रेरणा
७) नियोजन व अंमलबजावणी आणि नियंत्रण व समन्वय हे गनिमी काव्याचे घटक
८) गिरीदुर्गांची बांधीणीची सूत्रे
९) जलदुर्ग (सिंधूदुर्ग, विशेष संदर्भ) रचना

प्रकरण ४ थे

आरमार विषयक धोरण व पर्यावरण निती

स्वातंत्र्या नंतरच्या काळात महाराष्ट्रातील बंदरांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. हे सत्य आहे. कोकणांत लहान मोठी मिळून ४८ बंदरे आहेत. छत्रपती शिवाजीं महाराजांनी बंदरांचा उपयोग स्वराज्य निमिर्ती व स्वराज्य वृध्दीसाठी केला. हे सर्वज्ञात आहे. महाराष्ट्रातील बंदरे ही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. अशावेळी छत्रपतींच्या आरमार विषयक धोरणाबद्दलचा आदर अधिकच जास्त वाटायला लागतो. वाटेल त्या प्रमाणात बंदरांवर होत असलेले बांधकाम पाहून छत्रपतींनी सुरु केलेल्या उद्योग व्यवसाय वाढीची आठवण नक्कीच होते. जहाज बांधणीचा व्यवसाय शिवरायांच्या काळात जो तेजीत होता, त्याची आज काय परिस्थिती आहे ? ते आपल्याला माहिती आहे. भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने बंदरांसाठी जे निकष दिले त्या निकषांचा आज फारसा उपयोग नाही. तर त्यासाठी छत्रपतींच्या धोरणांचा अभ्यासच महत्वाचा आहे. याचा मागोवा या प्रकरणात घेण्यात येणार आहे. कारण सहयाद्री, गडकोट, किल्ले घोडदळ पायदळ याबरोबरच शिवरायांना गरज होती ती आरमाराची 'ज्याच्याजवळ आरमार, त्याचा समुद्र' हे त्याकाळच्या आरमाराचे महत्व. जावळी आणि रायरीबरोबरच १६५७ मध्ये कल्याण भिवंडी शिवरायांच्या ताब्यात आली, आणि सागरावर हुकूमत गाजवणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, सिद्दी या परकीय बलाढय सत्ताशीधांशी शिवरायांचा संपर्क आला व त्यांच्यात चकमकी घडू लागल्या. म्हणून आरमार उभारणीची महत्वाकांक्षा शिवरायांनी बाळगली. ती पूर्ण करतानाच वनसंपत्तीचे संवर्धनही महाराजांनी केलेले दिसते. पुणे जहागिरीत व रायगडाच्या व राजगडाच्या पायथ्याशी आमराई असल्याचे उल्लेख मिळतात. आंबा, फणस, साग, शिसव अशी महत्वाची झाडे अनेक मुलखातून व किल्ल्यांमध्येही लावली जात. त्याचा लेकरांप्रमाणेच सांभाळ करण्याच्या आज्ञा सर्व सुभ्यांतून सरकारातून, परगण्यांतून व खेडयांतून अधिकाऱ्यांना, वतनदारांना शिवरायांनी दिलेल्या दिसतात. मध्ययुगीन काळात शिवरायांचे आरमार हे अतिशय श्रेष्ठ दर्जाचे होते. त्याचा उद्देशच मुळात शत्रूशी संघर्ष करताना मराठी राज्याचे सामर्थ्य कमी पडू नये असाच होता. म्हणूनच आरमार विषयक पुढील माहितीचा सखोल अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

१. आरमारबांधणी, नियोजन व उद्दिष्टे

२. नौकांचे प्रमुख प्रकार

३. आरमार आणि जलदुर्ग

४. आरमार आणि पर्जन्यकाळ

५. आरमार आणि पर्यावरण (वनसंपत्तीचे संवर्धन)

या प्रकरणात 'आरमार' या राज्याच्या स्वतंत्र अंगाचा पर्यावरणीय दृष्टीकोनातून शिवरायांनी केलेला स्वराज्य रक्षणासाठी व संवर्धनासाठीचा वापर सविस्तर मांडला जाणार असून रयतेची, प्रजेची तेवढीच पर्यावरणाची (वनसंपत्ती) काळजी राजे घेत असत याची माहितीही त्यात दिली जाणार आहे.

प्रकरण ५ वे

जल व्यवस्थापन, दुष्काळ निर्मूलन व पर्यावरण संवर्धन

आजच्या प्रमाणेच दुष्काळी परिस्थिती शिवकाळातही होतीच. १६२९, १६३० व १६५० यावर्षी भीषण दुष्काळ पडल्याची नोंद इतिहासात आहे. हवामानाचा लहरीपणा शिवरायांनी लक्षात घेऊन जलव्यवस्थापन करण्यावर भर दिला, महाराष्ट्रात दरवर्षी पावसाळा येतो तसाच उन्हाळयात दुष्काळही येतो. बहुसंख्य गावात पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करणाऱ्या महिला, शेतकरी, शाळकरी मुलं आजही दिसतात. हा प्रश्न वरचेवर गंभीर होत जातो. थोडे मागे वळून पाहिल्यास लक्षात येते की, शिवरायांनी किल्ल्यांमध्ये पाण्याची मुबलक व्यवस्था करुन ठेवलेली होती. महाराष्ट्रातील सध्याच्या दुष्काळाच्या अनुषंगाने शिवकालीन किल्ल्यांमधील पाणी व्यवस्थापनाचा आढावा थोडक्यात या प्रकरणात घेण्यात येणार आहे. किल्ला बांधण्यापूर्वी किल्ला बांधणीचे स्थळ पाहून जलव्यवस्थापनासाठी शिवरायांनी दिलेल्या आज्ञा खूपच महत्वाच्या होत्या. त्या आज्ञा म्हणजे पाण्याचे नियोजन होते. पाण्याची कमतरता भासू नये वर्षभर पाणी पूरावे यासाठी वैशिष्टयपूर्ण 'टाके' गडांवर बांधली जात याची अनेक किल्ल्यांवरील पाणी व्यवस्थापनाची माहिती या प्रकरणात देण्यात येणार आहे. दुष्काळ निवारणाचे शिवरायांचे प्रयत्न हे देखील पर्यावरणीय दृष्टीकोनातून होते. पाणी म्हणजे गडावरील संपत्ती हाच दृष्टीकोन छत्रपतींचा व प्रजेचाही होता. पाणी हे सर्व नैसर्गिक साधन संपत्तीतील महत्वाचे संसाधन होय. संस्कृती व समाजाला सर्वच अंगानी भिडणारा हा अत्यंत महत्वाचा स्त्रोत होय. शेती, औद्योगिक विकास, धार्मिक मूल्ये, सांस्कृतीकता या सर्व गोष्टींनी मानवी विकासातील सामाजीक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात एक प्रभावी शक्ती व गरजेचा घटक म्हणून पाणी महत्वाची भुमीका बजावते.

आज जलनितीच्या संदर्भात अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. आज पर्यावरण तज्ञ संपुर्ण जगभर सांगत असतात की, पाण्यासंबंधी ज्या भिन्न श्रध्दा, समजुती, आचार विचार आणि व्यवहार यांचे अचुक भान आले तर पृथ्वीवरील जलसमस्या शाश्वत पध्दतीने सोडविणे शक्य आहे. संपुर्ण जगातच पर्यावरण तज्ज्ञ, जल तज्ज्ञ यावर अभ्यास करीत आहेत. कोणत्याही युगात सर्वच काळात पाणी व मानवी संस्कृती यांचे संबंध मोलाचे तितकेच गुंतागुंतीचे आहेत परंतु ते तितकेच पवित्रही आहेत. पाण्याचा संबंध अमृताशी, जीवनाशी, मातृत्वाशी असल्यानेच शुध्दता आणि पावित्र्याशी तो जोडलेला आहे. हे विश्लेषण यासाठी देत आहे की, छत्रपती शिवरायांनी मानवाचे पाण्याशी असलेले नाते ओळखले होते, म्हणूनच 'जलव्यवस्थापन' हा त्यांच्या प्रशासकीय कार्यातील एक महत्वाचा भाग होता. मध्ययुगीन काळात अनेकदा दुष्काळ पडल्याची नोंद आढळते. शिवरायांच्या हयातीत देखील अनेकदा दुष्काळ पडले. उभा महाराष्ट्र त्यात होरपळून निघत होता. परंतु त्यातूनही छत्रपतींनी मार्ग काढला. तो जलव्यवस्थापन या पर्यावरणीय नितीमधूनच.

प्रकरण ६ वे

उपसंहार

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील पाच प्रकरणांचा आढावा घेऊन छ. शिवरायांच्या पर्यावरणवादी विचारांचा व कृतींचा आढावा घेण्यात येणार आहे. यानुसार काही नवे निष्कर्ष काढून शासनाला, समाजाला व समाजकारण्यांना काही सूचना सूचित करण्याचाही प्रयत्न असणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची -

१. मराठयांच्या इतिहासाची संस्कृत साधने
डॉ. शिवदे सदाशिव
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २०१०
२. शिवभारत
सं. दिवेकर स.म.
भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - १८४९ शके
३. शककर्ते शिवराय
देशमुख विजय
छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन क्र. १ नागपूर १९८४
४. मोगल मराठे संघर्ष
पगडी सेतुमाधवराव
चित्रशाळा प्रेस, पुणे १९६४
५. मोगल मराठे
पगडी सेतुमाधवराव
ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३
६. शिवचरित्र एक अभ्यास
पगडी सेतुमाधवराव
शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर १९७१
७. विजापूरची आदिलशाही
पारनीस द.ब. संपा. बेंद्रे वा.सी.
मुंबई मराठी संग्रहालय, १९६८
महाराष्ट्रेतिहासाची साधने विभाग १-२-३
बेंद्रे वा.सी.
मुंबई मराठी संग्रहालयाच्या इतिहास संशोधन
मंडळाची ग्रंथमाला ऑक्टों. १९६५
८. शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास साधन चिकित्सा
बेंद्रे वा.सी.
लोकवाड्मय गृह प्रा.लि. मुंबई-४
९. मालोजीराजे व शहाजी राजे
बेंद्रे वा.सी.
प्रकाशन - ग्रंथकार प्रकाशन पुणे - १९६७

१०. शिवाजी कालीन पत्रसार संग्रह खंड १-२-३
सं. पोतदार द.वा.
मुजुमदार गं.ना. - भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे स्वीय ग्रंथमाला क्र. ४४ सन १९४९, १९५७
११. मराठयांच्या इतिहासाची साधने - १ ते ११ खंड
राजवाडे वि.का.
स्वीय प्रकाशन, पुणे
१२. शिवाजी निबंधावली
भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे
१३. श्री शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना आराखडा व साधने
शेजवलकर त्र्यं.शं.
मराठा मंदिर प्रकाशन - मुंबई १९६४
१४. ऐतिहासिक शकावच्या भाग १
सोबनी अविनाश
शब्दवेध प्रकाशन, पुणे - १९९८
१५. शिवभारत परमानंद
१६. सभासद बखर
कृष्णाजी अनंत सभासद
१७. राधा माधव विलास चंपू
जयराम पिंडये
१८. चिटणीस बखर
रामराव चिटणीस
१९. शिवरायांची अस्सल पत्रे आशय आणि वैचारिकता
डॉ. काकडे नभा
चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०११
२०. शिवछत्रपतींचे आरमार
गजानन मेहेंदळे
परममित्र पब्लिकेशन - २०१०
२१. वेध जलदुर्गांचा
चिले भगवान
शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर २०१०
२१. Shivaji the great (IV Vol. १९३२)
Dr. Balkrishan
२२. Research Methodology in History
Chitnis K.N.
Aalantic Publication and Distributors, New Delhi १९९८
२३. Shivaji Visit to Aurangzeb at Agra
Sarkar J.
Rajasthani Letters from the Jaipur State Archives publisher Kolkata - १९६३
२४. शिवचरित्र प्रदीप
आवटे द.वि. दिवेकर स.म.
भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९२५

२५.	आज्ञापत्र - रामचंद्रपंत अमात्य
२६.	गनिमी कावा - नामदेवराव जाधव.
२७.	मराठयाचा इतिहास - संपादक अ.रा.कुलकर्णी, ग.ह. खरे खंड पहिला
२८.	मराठे आणि महाराष्ट्र - संपादक अ.रा.कुलकर्णी

संशोधक विद्यार्थीनी
प्रा. सौ. धनश्री रामचंद्र कापशीकर
उमा महाविद्यालय, पंढरपूर

संशोधन मार्गदर्शक
डॉ. अरविंद पी. सोनटक्के
दिं. बिं. महाविद्यालय, भोकर जि. नांदेड